महाराष्ट्र पोलीस

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

मुंबई, दिनांक – १६/११/२०२३

पोमसं/D१६०७२[३३]/१/२०२३-Desk १६

विषय:- दिनांक १९ नोव्हेंबर, २०२३ ते २५ नोव्हेंबर, २०२३ हा सप्ताह "**कौमी एकता सप्ताह**" म्हणून साजरा करण्याबाबत व "कौमी एकता सप्ताहाच्या" कालावधीत दिनांक २४ नोव्हेंबर.२०२३ हा दिवस निधी संकलित करण्याकरिता "**ध्वजदिन**" म्हणून पाळण्याबाबत...

*******

उपरोक्त विषयाबाबतचे शासन परिपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. कौएदि-२०२३/प्र.क्र.३७/ का.८, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२३ च्या दोन परिपत्रकान्वये, दि. १९ नोव्हेंबर, २०२३ ते दि. २५ नोव्हेंबर, २०२३ हा सप्ताह "**कौमी एकता सप्ताह**" म्हणून साजरा करण्याबाबत व "कौमी एकता सप्ताहाच्या" कालावधीत दिनांक २४ नोव्हेंबर. २०२३ हा दिवस निधी संकलित करण्याकरिता "**ध्वजदिन**" म्हणून पाळण्याबाबत खालील नमुद घटक कार्यालय प्रमुखांना विनंती आहे की. त्यांनी उपरोल्लिखीत दोन्ही शासन परिपत्रकांमध्ये नमुद करण्यात आलेल्या सूचनांप्रमाणे. कार्यक्रम आयोजित करण्यासाठी पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

16/11/23

**(निसार तांबोळी)**
विशेष पोलीस महानिरीक्षक(प्रशासन)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग व दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.(सस्नेह)
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)
अपर पोलीस महासंचालक (रा.रा.पो बल/ वाहतूक / फोर्स वन / आर्थिक गुन्हे / नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

कृपया मागे पहावे...

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक (महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग / सायबर सुरक्षा / व्हीआयपी सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, पुणे / नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
उपसंचालक, महाराष्ट्र पोलीस अकादम, नाशिक.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गासह)
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुरावडी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. 1 ते 19.

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई.

२. पोलीस उप अधीक्षक, यांनी सदरहू ज्ञापनाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर दि. 19 नोव्हेंबर, 2023 ते दि. 25 नोव्हेंबर, 2023 हा सप्ताह "**कौमी एकता सप्ताह**" म्हणून आणि दि. 24 नोव्हेंबर, 2023 हा दिवस "**ध्वजदिन**" म्हणून पाळण्याबाबत.. / Obersvance of the **Communal Harmony Campaign Week** From 19th To 25th November, २०२३ and **Flag Day** on 25th November, २०२३ या मराठी व इंग्रजी नावाखाली प्रकाशित करण्यात यावा.

**दि.१९ नोव्हेंबर, २०२३ ते दि.२५ नोव्हेंबर, २०२३ हा सप्ताह "कौमी एकता सप्ताह" म्हणून साजरा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः कौएदि- २०२३/प्र.क्र. ३७/का.८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १ नोव्हेंबर, २०२३

## शासन परिपत्रक

केंद्र शासनाने सन १९८६ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार **दि.१९ नोव्हेंबर, २०२३ ते दि.२५ नोव्हेंबर, २०२३** हा सप्ताह **"कौमी एकता सप्ताह"** म्हणून राज्यात साजरा करावयाचा असून त्यामध्ये आयोजित करावयाच्या पुढील कार्यक्रमात जास्तीत जास्त लोकांना सहभागी करुन घ्यावयाचे आहे. त्यानुसार यावर्षी रविवार **दि.१९ नोव्हेंबर, २०२३ ते शुक्रवार दि.२५ नोव्हेंबर, २०२३** हा कालावधी **"कौमी एकता सप्ताह"** म्हणून पाळण्यात यावा व त्यातील जास्तीत जास्त लोकांना सहभागी करुन घेण्यात यावे.

१) **रविवार दिनांक १९ नोव्हेंबर, २०२३** - राष्ट्रीय एकात्मता दिवस : धर्मनिरपेक्षता जातीयवादी विरोध व अहिंसा यांच्यावर भर देणारे सभा, चर्चासत्रे व परिसंवाद आयोजित करावेत.

२) **सोमवार दिनांक २० नोव्हेंबर, २०२३** - अल्पसंख्याक कल्याण दिवस : अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी १५ कलमी कार्यक्रमावर भर देण्यात यावा, जातीय दंगली उदभवणाऱ्या शहरातून बंधुभाव निर्मितीसाठी खास मिरवणूका काढण्यात याव्यात.

३) **मंगळवार दिनांक २१ नोव्हेंबर, २०२३- भाषिक सुसंवाद दिवस :** भारताच्या अन्य भागातील लोकांच्या भाषेचा वारसाचा परिचय करुन देण्याच्या दृष्टीने विशेष वाङमयीन कार्यक्रम व कवी संमेलने आयोजित करण्यात यावीत.

४) **बुधवार दिनांक २२ नोव्हेंबर, २०२३ - दुर्बल घटक दिवस :** २० कलमी कार्यक्रमाअंतर्गत अनुसूचित जाती व जमाती मधील व्यक्ती व कमकुवत घटकातील व्यक्ती यांना मदत करण्यासाठी ठरवून दिलेले कार्यक्रम ठळकपणे निदर्शनास आणण्याच्या दृष्टीने सभा व मेळावे भरविण्यात यावेत. त्यावेळी खालील गोष्टींवर भर देण्यात यावा.

अ) इंदिरा आवास योजना व घरासाठी जागांचे वाटप व कर्जाचे वाटप.

ब) अतिरिक्त जमिनीचे भूमिहीन मजुरांना वाटप.

क) गरीबांना कायदेविषयक सहाय्य देण्याचे कार्यक्रमही आयोजित करण्यात यावेत.

५) **गुरुवार दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ - सांस्कृतिक एकता दिवस :** भारतीयांच्या विविधतेतील एकतेवर भर देणारे आणि सांस्कृतिक संरक्षण व एकात्मता संबंधाची भारतीय परंपरा सादर करणारे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

६) **शुक्रवार दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ - महिला दिन :** भारतीय समाजातील महिलांचे महत्व व राष्ट्र उभारणीच्या विकासामधील त्यांची भूमिका यावर भर देण्यात यावा.

७) **शनिवार दिनांक २५ नोव्हेंबर, २०२३ - जोपासना दिवस :** पर्यावरणाची जोपासना व त्याची जाणीव यासाठीच्या वाढत्या गरजेवर भर देणारे मेळावे व कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

२. वरीलप्रमाणे कार्यक्रमाची रुपरेखा लक्षात घेऊन माध्यमांचा उपयोग करावा.

१) ध्वजारोहण

२) मिरवणूका व सभा

३) राष्ट्रीय एकतेची शपथ

४) चर्चासंमेलने

५) चित्रपट दाखविणे व प्रदर्शने

यावर्षी दिनांक १९ नोव्हेंबर, २०२३ रोजी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घ्यावयाची आहे. या शपथेचा नमुना सोबत जोडला आहे. राज्यातील सर्व केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या कार्यालयातून ही शपथ घेण्याचा कार्यक्रम राबविण्यात यावा. तसेच भित्तीपत्रके, फलक यांच्यावर ठसठशीत असे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिकचिन्ह प्रदर्शित करावे.

३. शैक्षणिक संस्थांच्या बाबतीत त्यांनी दि.१९ नोव्हेंबर, २०२३ ते दि.२५ नोव्हेंबर, २०२३ दरम्यान एक सभा शक्यतो सकाळी प्रार्थनेच्या तासानंतर आयोजित करावी. सभेच्या अध्यक्षपदी संस्थेच्या सोयीप्रमाणे प्राचार्य किंवा विशेष निमंत्रित असावेत. त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मता व ऐक्यभाव यासंबंधी विद्यार्थ्यांना समजेल अशा स्वरुपात विवेचने करावीत. दि.१९ नोव्हेंबर, २०२३ रोजी त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घ्यावी. कार्यक्रमाची सांगता समूह राष्ट्रगीताने करावी. शैक्षणिक संस्थांनी दि.१९ नोव्हेंबर, २०२३ ते दि.२५ नोव्हेंबर, २०२३ या सप्ताहात राष्ट्रीय एकात्मतेची विविध पैलू ठळकपणे निदर्शनास आणण्यासाठी एखादा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे अपेक्षित आहे.

४. स्वयंसेवी संस्थांनी करावयाचे कार्यक्रम त्यांच्या सोयीने करण्याची त्यांना मोकळीक आहे. मात्र खालीलपैकी एक तरी कार्यक्रम त्यांनी राष्ट्रीय एकात्मता सप्ताहात ठेवावे -

१) राष्ट्रीय एकात्मतेवर प्रख्यात पुढाऱ्यांची भाषणे

२) राष्ट्रीय एकात्मतेची शपथ सामूहिकरित्या घेणे.

३) सांस्कृतिक कार्यक्रम करणे

४) राष्ट्रगीताचे सामूहिक गायन

५. शासकीय कार्यालये व शासन अंगीकृत संस्था यांच्याबाबतीत दि.१९ नोव्हेंबर, २०२३ रोजी विभागप्रमुखानी सभा आयोजित करावी. सभेच्या अध्यक्षस्थानी महत्वाच्या सामाजिक व्यक्ती असाव्यात. भाषणानंतर कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची एकत्रित शपथ देण्यात यावी व कार्यक्रमाच्या शेवटी सामूहिक राष्ट्रगीत ठेवावे.

६.	माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने निरनिराळ्या माध्यमाव्दारे या कार्यक्रमांस प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच राष्ट्रीय एकात्मतेचे संदेश देणारे चित्रपट दाखविले जातील असे पहावे.

७.	महिला व बालविकास विभाग तसेच सांस्कृतिक कार्य विभाग यांनी विविध ठिकाणी उचित कार्यक्रम आयोजित करुन पार पाडावेत.

८.	सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपआपल्या कार्यक्षेत्रात सर्व संबंधितांची मदत घेऊन हा कार्यक्रम वरीलप्रमाणे त्यांच्या विविध माध्यमातून आखला जाईल व यशस्वी केला जाईल असे पहावे. तसेच केलेल्या कार्यक्रमाचा अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२३११०११५४३४५०९१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANAND NARAYANRAO BHONDVE

Digitally signed by ANAND NARAYANRAO BHONDVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=a11586f7ebf5942c9727d91c8c251f01dab61da28a62264d92646e4dc3827d4d, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=D040EF80427E869FA7C6F2F326EAF61F9B4591294C9BE6229580E816D54D3859, cn=ANAND NARAYANRAO BHONDVE
Date: 2023.11.01 15:43:09 +05'30'

**(आ. ना. भोंडवे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व विभागीय आयुक्त,
७. सर्व जिल्हाधिकारी,
८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
९. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,
१०.पोलिस महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य,
११.सर्व पोलिस आयुक्त,
१२.सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक,
१३.अध्यक्ष/ सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,
१४.अध्यक्ष/ कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई,
१५. मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे आणि

सार्वजनिक यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापकीय संचालक/प्रशासकीय अधिकारी,

१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)

१७. कक्ष अधिकारी, सा.प्र.वि./२९, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई (मंत्रालयात कार्यक्रम आयोजित करण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी)

१९. निवड नस्ती (का-८).

## राष्ट्रीय एकात्मता शपथ

" मी गांभीर्यपूर्वक शपथ घेतो/ घेते की, देशाचे स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय एकात्मा अबाधित राखण्यासाठी व दृढ करण्यासाठी मी निष्ठापूर्वक काम करीन"

मी अशीही प्रतिज्ञा करतो/करते की, मी कधीही हिंसाचाराचा अवलंब करणार नाही. तसेच मी सर्व धार्मिक, भाषिक किंवा प्रादेशिक मतभेद व तंटे किंवा इतर राजकीय वा आर्थिक गाऱ्हाणी शांततामय आणि सांविधानिक मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न चालू ठेवीन.

## राष्ट्रीय एकात्मता प्रतिज्ञा

"मै सत्यनिष्ठा से प्रतिज्ञा करता हुं की देश आझादी तथा एकता बनाये रखने और उसे मजबूत रखने के लिए समर्पित होकर कार्य करुंगा"

"मै यह भी प्रतिज्ञा करता हूॅ की कभी हिंसा का सहारा नही लूंगा तथा धर्म, भाषा, क्षेत्र से संबंधित भेदभाव और झगडो और अन्य राजनैतिक या आर्थिक शिकायतो का निपटारा शांतीपूर्ण तथा संवैधानिक तरीको से करने के लिए प्रयास करता रहूंगा"

## National Integration Pledge

"I solemnly pledge to work with dedication to preserve and strengthen the freedom and integrity of the nation."

"I further affirm that I shall never resort to violence and that I will continue to endeavor towards settlement of all difference and disputes relating to religion, language, region or other political or economic grievances by peaceful and constitutional means. "

**कौमी एकता सप्ताहाच्या” कालावधीत दि.२४ नोव्हेंबर, २०२३ हा दिवस निधी संकलित करण्याकरिता “ध्वजदिन” म्हणून पाळण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः कौएदि- २०२३/प्र.क्र. ३७/का.८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १ नोव्हेंबर, २०२३

## शासन परिपत्रक

केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने स्थापन केलेल्या राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठान, नवी दिल्ली या संस्थेच्या वतीने दि.१९ नोव्हेंबर, २०२३ ते दि. २५ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत पाळण्यात येणाऱ्या कौमी एकता सप्ताहामध्ये **“सांप्रदायिक सदभावना मोहिम (Campaign) निधी संकलन सप्ताह”** साजरा करण्यात येणार आहे. **शुक्रवार दि २४ नोव्हेंबर, २०२३ रोजी “ध्वजदिन साजरा”** करण्यात येणार आहे. ध्वजदिनाचा निधी संकलित करण्याकरिता व संकलित केलेला निधी राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठान, नवी दिल्ली यांच्याकडे सूपुर्द करण्याकरिता अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत खालील सूचना देण्यात येत आहेत :-

१) **शुक्रवार दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३** या दिवशी सर्व शासकीय कार्यालये, विद्यालये, महाविद्यालये, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे, सार्वजनिक संस्था आणि देणगीदार यांच्याकडून स्वेच्छेने निधी संकलित करण्यात यावा.

२) शासकीय कार्यालये, विद्यालये, महाविद्यालये, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे या कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून सदर निधी डब्यांतून संकलित करण्यात यावा. खाजगी संस्था वा देणगीदार अथवा करदाते यांना सदर निधीसाठी रक्कम दान म्हणून दयावयाची असेल तर त्यांच्याकडून अशी रक्कम धनादेशाव्दारे स्विकारण्यात यावी. धनादेशाव्दारे स्विकारलेल्या रकमेची पोच पावती त्यांना देण्यात यावी (पोच पावतीचा नमुना सोबत जोडला आहे).

३) खाजगी संस्था वा देणगीदार अथवा करदाते यांच्याकडून रक्कम धनादेशाव्दारे स्विकारताना धनादेश सचिव, राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठाण, नवी दिल्ली या नांवाने घेण्यात यावा.

४) निधी संकलित करण्यासाठी प्रत्येक जिल्हयातील जिल्हाधिकाऱ्यांनी व मंत्रालयीन विभागांनी माजी सैनिक कल्याण मंडळे, रेड क्रॉस सोसायटी अथवा तत्सम संघटना यांच्याकडून डबे उपलब्ध करुन घ्यावेत व निधी संकलित करण्याची कार्यवाही करावी.

५) निधी संकलित केलेले डबे सचिव, राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठान, नवी दिल्ली यांचेकडे पाठविणे अडचणीचे, गैरसोयीचे व जोखमीचे असते. म्हणून डब्यात संकलित केलेला निधी हा कार्यालयातील जबाबदार अधिकाऱ्यासमोर मोजून त्याचा डिमांड ड्राफ्ट तयार करुन तो व इतर संस्था, देणगीदार यांच्याकडून आलेले धनादेश सचिव, राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठाण, सी विंग, ९ वा मजला, लोकनायक भवन, खान मार्केट, नवी दिल्ली - ११० ००३ यांच्याकडे नोदंणी टपालाव्दारे परस्पर पाठवावा किंवा संकलित केलेला निधी खालील बॅक खात्यावर परस्पर हस्तांतर करण्यात यावा व त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयात दि.१५ डिसेंबर, २०२३ पर्यत न चुकता पाठवावा.

| | |
|---|---|
| Name of Bank | Central Bank of India |
| Address of Bank | Khan Market, New Delhi- 110003 |
| Name of A/C holder | National Foundation for Communal Harmony |
| Account Number | 1065439058 |
| NEFT/IFSC/RTGS | CBIN0280310 |

Or

| | |
|---|---|
| Name of Bank | State Bank of India |
| Address of Bank | Nirman Bhavan, Maulana Azad Road, New Delhi- 110011 |
| Name of A/C holder | National Foundation for Communal Harmony |
| Account Number | 10569548047 |
| NEFT/IFSC/RTGS | SBIN0000583 |

Or

| | |
|---|---|
| Name of Bank | Bank of India |
| Address of Bank | Khan Market, New Delhi- 110003 |
| Name of A/C holder | National Foundation for Communal Harmony |
| Account Number | 600710110006040 |
| NEFT/IFSC/RTGS | BKID0006007 |

राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठान, नवी दिल्ली या संस्थेच्या वतीने दि.२४ नोव्हेंबर, २०२३ रोजी संकलित करावयाच्या निधीसाठी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम ११ मधील तरतूद शिथिल करुन निधी संकलित करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांस मुभा देण्यात येत आहे.

सर्व जिल्हाधिकारी आणि सर्व मंत्रालयीन विभागांचे सचिव यांना उपरोक्त सूचनांप्रमाणे उचित कार्यवाही करुन जास्तीत जास्त निधी संकलित करण्याचा प्रयत्न करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२३११०११५४८०७२२१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ANAND NARAYANRAO BHONDVE

Digitally signed by ANAND NARAYANRAO BHONDVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=a11586f7ebf5942c9727d91c8c251f01dab61da28a62264d92646e4dc3827d4d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D040EF80427E869FA7C6F2F326EAF61F9B4591294C9BE6229580E816D54D3859, cn=ANAND NARAYANRAO BHONDVE
Date: 2023.11.01 15:47:27 +05'30'

**( आ. ना. भोंडवे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई,
६. सर्व विभागीय आयुक्त,
७. सर्व जिल्हाधिकारी,
८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
९. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,
१०.पोलिस महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य,
११.सर्व पोलिस आयुक्त,
१२.सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक,
१३.अध्यक्ष/ सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
१४.अध्यक्ष/ कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई
१५.मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापकीय संचालक/प्रशासकीय अधिकारी
१६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१७.कक्ष अधिकारी, सा.प्र.वि./२९, सामान्य प्रशासन अधिकारी, मंत्रालय, मुंबई (मंत्रालयात कार्यक्रम आयोजित करण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी)
१९.निवड नस्ती (का-८).

**राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठान, नवी दिल्ली**

**दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ ध्वजदिन निधी**

ठिकाण :- दिनांक :-

श्री/श्रीमती ________________________________________यांचे कडून

रुपये ___________________________

(अक्षरी) ________________________________________ध्वजदिन निधीस मदत म्हणून मिळाले.

वसूल करणाऱ्याची सही व शिक्का

आयकर कायदा १९६१ मधील कलम ८० जी. अन्वये दिलेली रक्कम ही आयकरातून मुक्त करण्यात आली आहे.

**टिप :- सदर पोच पावतीवर रबरी शिक्का उमटविण्यात यावा.**